भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे

---

१) भारत निवडणूक आयोग यांचेकडील दिनांक- १५/१०/२०२४ रोजीचे प्रेस नोटनुसार.
२) जा.क.वि.शा./ निवडणुक/मनाई आदेश/१५/२०२४, दिनांक:- १५/१०/२०२४

आदेश:-

ज्या अर्थी उपोद्घातातील अ.क.१ मधील अधिसूचनेनुसार भारत निवडणूक आयोगाने, महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ कार्यक्रम जाहीर केलेला असून दिनांक १५/१०/२०२४ रोजीपासून आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. ठाणे शहर आयुक्तालयातील १४ विधानसभा मतदारसंघात दि.२०/११/२०२४ रोजी मतदान व दि.२३/११/२०२४ रोजी मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होणार आहे. निवडणूकीच्या अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये १३४ - भिवंडी ग्रामीण, १३६ - भिवंडी पश्चिम, १३७ - भिवंडी पुर्व, १३८ - कल्याण पश्चिम, १३९ - मुरबाड, १४० - अंबरनाथ, १४१ -उल्हासनगर, १४२ - कल्याण पुर्व, १४३ - डोबिंवली, १४४ - कल्याण ग्रामीण, १४६ - ओवळा माजिवडा, १४७ - कोपरी पाचपाखाडी, १४८ - ठाणे, १४९ - मुंब्रा कळवा मतदार संघ असे एकूण १४ विधानसभा मतदारसंघ येतात.

आणि ज्याअर्थी ठाणे पोलीस आयुक्तालयात यापूर्वी वेगवेगळया पक्षांमध्ये राजकीय स्पर्धेपोटी वाद निर्माण होवून वेगवेगळया निवडणुकीच्या संबंधात दखलपात्र व अदखलपात्र गुन्हे दाखल झालेले आहेत. आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या निमित्ताने स्थानिक कार्यकर्त्यामध्ये आपसात भांडणतंटे होवून हातघाईवर येण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशा प्रसंगी एखादया गटाकडून/व्यक्तीकडुन हत्याराचा दुरुपयोग होवून गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरीता ठाणे पोलीस आयुक्तालयातील निवडणुकीच्या कार्यक्षेत्रात शस्त्र परवानाधारक यांनी शस्त्र बाळगण्यास व ने-आण करण्यास प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे क्रमप्राप्त वाटते.

त्या अर्थी, उपरोक्त परिस्थितीत मी ' मीना मकवाणा ' पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर आम्हास पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेले अधिकार त्यांनी कार्यालयीन आदेश क.CP/SB/ORDERS/152/2024, दिनांक ०५/०७/२०२४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून असा आदेश देते की, ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीतील शस्त्र परवानाधारक यांना शस्त्र ताब्यात ठेवण्यास व बाळगण्यास मनाई करण्यात येत आहे. तथापि छाननी समितीने ज्यांना सवलत दिलेली आहे त्या शस्त्र परवानाधारकांना हा मनाई आदेश लागू होणार नाही.

यापुढे असेही आदेश देण्यात येत आहे की, ज्या शस्त्र परवानाधारकांना या आदेशान्वये छाननी समितीने सवलत दिलेली आहे त्या शस्त्र परवानाधारकांनी आपली शस्त्रे निवडणूकीच्या कोणत्याही कार्यक्रमादरम्यान उदा. प्रचार, सभा व रॅली प्रसंगी जवळ बाळगू नये.

प्रत्येक शस्त्र परवानाधारकास आदेशापूर्वी नोटीस बजावणे शक्य नसल्याने कलम १६३ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

सदरचा आदेश ठाणे पोलीस आयुक्तालयातील **सर्व पोलीस स्टेशन हद्दीत दि. १५/१०/२०२४ रोजी १५:३० वा. पासून ते दि.२३/११/२०२४ रोजीचे २४.०० वा. पर्यत अंमलात राहील.**

उपरोक्त मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या शस्त्र परवानाधारकांवर भारतीय न्याय संहितेचे कलम २२३ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल. सदरचा आदेश दिनांक १५/१०/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यांने दिला आहे.

दिनांक :- १५/१०/२०२४
शिक्का

मीना मकवाणा IPS 15/10/24
पोलीस उप आयुक्त,
विशेष शाखा, ठाणे शहर

Scanned with CamScanner

प्रति:-

१) व्यवस्थापक, सरकारी मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई. (राजपत्रात प्रसिध्दीसाठी)
२) सर्व पोलीस स्टेशन व शाखा प्रभारी अधिकारी, आयुक्त परिसर, ठाणे.
३) सर्व पोलीस उप आयुक्त, आयुक्त परिसर, ठाणे.
४) सर्व सहा.पोलीस आयुक्त, आयुक्त परिसर ठाणे.
५) जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे.
६) समन्वय अधिकारी, ९ ए.एस.,ठाणे (पोलीस पत्रक प्रसिध्दीसाठी)

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१) पोलीस सह आयुक्त, ठाणे.
२) अपर पोलीस आयुक्त, प्रादेशिक विभाग,पश्चिम ठाणे, पुर्व कल्याण, गुन्हे व प्रशासन.
३) जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे.
४) निवडणुक निर्णय अधिकारी,
   १) १३४ - भिवंडी ग्रामीण , मतदार संघ.
   २) १३६ - भिवंडी पश्चिम, मतदार संघ.
   ३) १३७ - भिवंडी पुर्व, मतदार संघ.
   ४) १३८ - कल्याण पश्चिम, मतदार संघ.
   ५) १३९ - मुरबाड, मतदार संघ.
   ६) १४० - अंबरनाथ, मतदार संघ.
   ७) १४१ - उल्हासनगर, मतदार संघ.
   ८) १४२ - कल्याण पुर्व, मतदार संघ.
   ९) १४३ - डोबिंवली, मतदार संघ.
   १०) १४४ - कल्याण ग्रामीण, मतदार संघ.
   ११) १४६ - ओवळा माजिवडा, मतदार संघ.
   १२) १४७ - कोपरी पाचपाखाडी, मतदार संघ.
   १३) १४८ - ठाणे, मतदार संघ.
   १४) १४९ - मुंब्रा कळवा, मतदार संघ.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

१) अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मत्रांलय, महाराष्ट्र राज्य मुंबई
२) आयुक्त, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य मुंबई
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुबंई

Scanned with CamScanner